# परिशिष्ट

## प्रथम केलेली यादी

## गुण व भाषा कौशल्ये यादी

### मराठी अध्यापकास आवश्यक गुण व भाषा कौशल्ये यादी

१) वाङ्.मयातील संस्कारक्षमता एखाद्या उता-यावरील वा पद्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहिणा-याला तो उतारा वा पद्य पूर्णपणे समजलेले असते असे नाही. त्यातील शब्दांचा अर्थ, दु:खाची तिव्रता, विनोदाची छटा, उपरोध, आनंदाची उत्कटता समजून घेऊन विद्यार्थ्यांच्यावर संस्कार करणे, गद्यात किंवा पद्यात प्रतिबिंबीत जीवनदर्शन विद्यार्थ्यांना घडविणे व विद्यार्थ्यांच्यात वैचारिक जागृती निर्माण करण्याची क्षमता मराठी अध्यापकाजवळ असली पाहिजे.

२) वाचन व्यासंग - विविध वाङ्.मय प्रकार - कादंबरी, नाटक, काव्य, नाट्यछटा, कथा, लघुकथा, चरित्र इत्यादी वाचन, व्यासंग अधिक असला पाहिजे. अध्यापन विषया अनुरूप संदर्भग्रंथांचे वाचन.

३) लेखन व्यासंग - काव्यलेखन, लेख लिहिणे, कथा लिहिणे, नाटक, विनोदी चुटके लिहिणे हा लेखन व्यासंगही मराठी अध्यापकास आवश्यक.

४) कथन कौशल्य - गद्यातील वा पद्यातील वासना, विचार स्पष्ट करून सांगण्यासाठी मराठी अध्यापकाकडे कथनकौशल्य असणे आवश्यक. अमूर्त शब्द निवेदन, स्पष्टीकरण, निरूपण व विश्लेषण करून विद्यार्थी मनावर मूर्त स्वरूपात प्रतिबिंबीत करण्याची क्षमता मराठी अध्यापकाजवळ असली पाहिजे. कथनातून वातावरण निर्मिती केली पाहिजे.

५) भाषण व्यासंग - विविध विषयावर व्याख्याने देण्याचा व्यासंग.

६) श्रवण व्यासंग - साहित्यिक चर्चा, परिसंवाद, साहित्य संमेलनातील व्याख्याने ऐकण्याचा व्यासंग अध्यापकास पाहिजे.

७) वाचन कौशल्य - अध्यापनातील अध्यापकांच्या प्रकट वाचनाला अधिक महत्व, गद्यातील किंवा पद्यातील भाव भावना, विचार, कल्पना यांचे अचूक दर्शन विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी अध्यापकांनी प्रकट वाचन केले पाहिजे. वाचनातील चढ-उतार, शुध्द व स्पष्ट उच्चार, योग्य विराम इत्यादीना अनुसरून वाचन केले पाहिजे.

८) प्रभावी व्यक्तिमत्व - अध्यापकाचे प्रभावी व्यक्तिमत्व अध्यापनात विद्यार्थी मनावर अध्ययन, अनुभव संस्कारक्षम करण्यास उपयुक्त आहे.

९) उच्चार व लेखन कौशल्य - अक्षरे उच्चारताना कोणत्या अवयवांचा कसा उपयोग होतो हे शिक्षकास ज्ञान असणे आवश्यक त्यामुळे लेखन दोष व उच्चार दोष होणार नाहीत. लेखनशैली, लेखनाची धाटणी, हे लेखनात केलेल्या कमी अधिक शब्दांच्या फरकाचे अर्थात होणारा बदल याचे अध्यापकास ज्ञान हवे. अक्षर वळणदार असणे आवश्यक.

१०) अध्यापनतंत्रा विषयी आधुनिक ज्ञान.

११) शब्दांच्या वा रचनेच्या योग्यायोग्यते बद्दल महत्वाची तीव्र जाणीव पाहिजे.

१२) प्रयोगशीलता - भाषण, लेखन, वाचन, दर्जा सुधारणे, दृक-श्राव्य साधनांचा उपयोग, उच्चार दोष सुधारणे, लेखन दोष सुधारणे, हस्ताक्षर सुधारणे यासाठी निरनिराळे प्रयोग सतत केले पाहिजेत.

१३) अध्यापकाकडे नाट्यात्मकता असावी.

१४) मराठी विषयी आवड - भाषाभगिनी.

१५) विद्यार्थ्यांविषयी जिव्हाळा.

१६) काव्यातील गेयता.

१७) भाषण कौशल्य - ज्ञानाधिष्ठित भाषण, भाषणात प्रवाहीपणा, ओज, सहजता असली पाहिजे.

१८) अध्यापन विषयाचे नियोजन.

१९) आत्मविश्वासपूर्ण अध्यापन.

२०) वर्गवारविहित उद्दिष्ठानुरूप अध्यापन.

२१) श्रवणकौशल्य - अनुनासिकाच्या नियमाप्रमाणे श्रवण करण्याचे कौशल्य.

२२) ज्ञानोत्सुक मन, चिंतनशीलता, सामाजिक विचार प्रवाहाशी चिकटून रहाण्याची इच्छा, सत्य-शिव-सौंदर्य याबद्दलचे प्रेम यातून अध्यापकाची स्वत:ची जीवन विषयक दृष्टी बनलेली असावी. अशी जीवन विषयक दृष्टी गद्यातील वा पद्यातील दु:ख, आनंद, असहाय्यता, श्रध्दा याविषयी निरूपण - वा स्पष्टीकरण करताना अध्यापकास उपयुक्त ठरते.

## दुरूस्तीनंतरची अंतीम यादी

### आवश्यक गुण

१) भाषाभगिनी व विद्यार्थ्यांविषयी जिव्हाळा.

२) अध्यापन विषयाचे नियोजन.

३) आत्मविश्वासपूर्ण अध्यापन.

४) अध्यापन तंत्र ज्ञान -

अ) अध्यापन तंत्राचे सम्यक ज्ञान.

ब) संदर्भशोधनाची माहिती.

क) अध्यापन पध्दतीविषयी ज्ञान.

ड) मूल्यमापन ज्ञान.

५) संशोधनशीलता (प्रयोगशीलन) :

अ) भाषण, वाचन, लेखन, पाठांतर, स्मरण यातील दोष सुधारण्यासाठी विविध प्रयोग.

ब) दृक्-श्राव्य साधनांचा वापर करण्याचे प्रयोग.

क) उच्चार दोष सुधारण्यासाठी प्रयोग.

ड) हस्ताक्षर सुधारण्यासाठी प्रयोग.

६) मराठीच्या शिक्षकाला इतर शिक्षकांच्या सहकार्याची आवश्यकता. मराठीचा शिक्षक कितीही तज्ञ असला तरी विद्यार्थी स्पष्ट व शुध्द भाषा बोलतात किंवा लिहितात की नाही हे बघण्याची जबाबदारी सर्व शिक्षकांची आहे. म्हणून इतर शिक्षकांचे साहाय्य याबाबतीत संपादन करावे.

७) प्रभावी व्यक्तिमत्व :

अ) सुस्पष्ट आवाज.

ब) विषयाचे सखोल ज्ञान.

क) शुद्ध व वळणदार लेखन.

ड) भाषणातील ओज व सहजता.

इ) स्वत:ची जीवनविषयक दृष्टी.

ई) सत्य, पवित्र, शाश्वत याबद्दलचे प्रेम.

उ) सामाजिक विचार प्रवाहाशी चिकटून राहाण्याची वृत्ती.

८) उद्दिष्ठानुरूप अध्यापन.

९) अवांतर परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे. उदा. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या परीक्षा यामुळे शिक्षकांचा व्यासंग वाढून अभ्यासात अधिक प्रगती होईल व विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी गोडी निर्माण होईल.

१०) बहुश्रुतता :

अ) अध्यापनात दाखले, उदाहरणे.

ब) कादंबरी, नाटक, काव्य, नाट्यछटा, कथा, लघुकथा, चरित्र इ. वाङ्मय प्रकारांचे ज्ञान.

क) समीक्षण.

ड) साहित्यिक चर्चा, परिसंवाद, साहित्य संमेलनातील व्याख्याने ऐकण्याचा व्यासंग.

इ) विविध विषयावर व्याख्याने देण्याचा व्यासंग.

११) वाङ्मयीन संस्कारक्षम मन :

अ) उताऱ्यातील वाङ्मयीन मूल्य व विचार, संस्कारमूल्य, शब्दछटा जाणण्याचे सामर्थ्य.

ब) शब्दसामर्थ्य जाणून त्याचा प्रत्यक्ष वापर करून गद्यातील वा पद्यातील चित्रित अनुभव शब्दांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मन:चक्षूसमोर उभे करण्याचे सामर्थ्य.

क) सृजनशीलता (रचनाशीलता) काव्य, लेख, कथा, नाटक, विनोदी चुटके.

इ) लेखन करण्याचा व्यासंग.

ई) शब्दांच्या वा रचनेच्या योग्यायोग्यतेबद्दल महत्वाची तीव्र जाणीव.

१३) नाट्यात्मकता.

## भाषाकौशल्ये यादी

१) श्रवण :

अ) अर्थपूर्ण श्रवण.
ब) अर्थग्रहण.
क) आकलन.
ड) सारग्रहण.

२) वाचन :

अ) मूक व प्रकट वाचन - अर्थग्रहण सुलभतेसाठी विरामानुसार वाचन.
ब) गद्य - सुस्पष्ट, वाक्यघटक व वाक्यलय यांचे आकलन होईल असे.
क) पद्य - ताल, भाव यांचे भान ठेवून त्यांचा अविष्कार घडविणारे.
ड) नाट्य - रसाविर्भावी, शब्दावर व वाक्यांशावर योग्य भर देऊन.

३) उच्चार :

अ) प्रमाण म्हणून जे मानले आहे त्याप्रमाणे शुध्द काय व सदोष काय, विद्यार्थ्यांच्या उच्चारात सदोषता कोणती याचे ज्ञान.
ब) शुध्द उच्चार.
क) उच्चार घटकांचा उच्चार व उच्चार स्थानांची स्थिती यांचे ज्ञान.
` शब्दातील मागील-पुढील अक्षरांच्या अक्षरोच्चारावर होणाऱ्या परिणामांचे ज्ञान आणि प्रात्यक्षिक. `

४) मनन, चिंतन, स्मरण - ऐकलेल्याचे व वाचलेल्याचे.

५) उपयोजन.

६) प्रकटीकरण :

अ) कथन - १) निवेदन

२) भाषण
३) संभाषण
४) वर्णन
५) कथाकथन
६) वातावरण निर्मिती
७) स्पष्टीकरण.

ब) गायन - सुरेल आवाजात तालासुरावर काव्यानुकूल प्रभावी. हे नसल्यास टेपरेकॉर्डरचा उपयोग.

क) लेखन - स्वच्छ, वळणदार, स्पष्ट, रेखीव, शुध्द व अर्थपूर्ण.

७) पाठांतर - गद्य, पद्य, नाट्य, कथा, चुटके, बोधवाक्ये, विनोद इत्यादी.